**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०३/२०१७**
**सरकार तर्फे वनपरिक्षेत्र कोठारी विरुध्द**
**अशोक लक्ष्मण फलके**
निशाणी क्र. ११

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ याची दोषारोपापूर्वीची शपथेवर साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक शपथेवर निवेदन करते की,
माझे नाव - क्षिरसागर आत्माराम मुलमुले,
वय - ५४ वर्षे, धंदा - वनरक्षक,
सध्या नेमणूक – सामाजिक वनीकरण, सिंदेवाही, ता.सिंदेवाही, जि. चंद्रपूर.

**<u>सरतपास अभियोग पक्षाकरिता सहा.सरकारी अभियोक्ता कु. माधुरी जोगे यांच्यामार्फत -</u>**

१. आरोपीस मी ओळखतो. दिनांक १९.१२.२०१५ रोजी माझी घोसरी वनपरिक्षेत्रात ड्युटी होती. त्यादिवशी कक्ष क्र. ५४४ मध्ये मी पहाटे ५.०० वाजेपासून क्षेत्र सहाय्यक श्री. गोंगले यांच्यासह गस्तीवर होतो. त्यावेळी आम्हाला जंगलातून ट्रॅक्टरचा आवाज आला असता आम्ही त्या दिशेने गेलो. आम्हाला जंगलातून एक ट्रॅक्टर येताना दिसले. त्याच्या चालकाला मी त्याच्याकडे रेतीचा परवाना वगैरे आहे काय अशी विचारणा केली असता त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. आम्ही त्याला ती रेती कुठून आणल्याचे विचारल्याचे असता त्याने ती जंगलातील नाल्यातून आणल्याचे सांगितले. त्याला घटनास्थळ दाखविण्यास सांगितले असता त्याने ते दाखविले. त्यानुसार आम्ही तिथे मौका पंचनामा करुन त्याचे ट्रॅक्टर घोसरी उप-वन परिक्षेत्रात लावले. मौका पंचनामा आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी, श्री. गोंगले यांची व पंचांच्या सह्या आहेत. त्यास **नि.क्र. १२** देण्यात येतो.

२. त्यानंतर आम्ही तिथे रेती भरलेल्या ट्रॅक्टरचा जप्ती पंचनामा केला. तो आता मला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी, श्री. गोंगले यांची व पंचांच्या सह्या आहेत. त्यास **नि.क्र. १३** देण्यात येतो. त्यानंतर मी वन अपराध पतिवृत्त नोंदविले. ते आता मला दाखविण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. १४** देण्यात येतो. त्यानंतर पुढील

कारवाई गोंगले साहेबांनी केली. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास राखून ठेवला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

Sameer Dilip Kamalakar

Digitally signed by Sameer Dilip Kamalakar
Date: 2025.01.23 17:04:01 +0530

(स.दि.कमलाकर)

दिनांक - २३.०१.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पोंभुर्णा.